# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.02.2025** **वार- सोमवार**

---

**शेतकरी सन्मान**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा आज सहावा वर्धापनदिन आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज बिहारमध्ये भागलपूरमधून या योजनाचा 19वा हप्ता देशभरातील शेतकऱ्यांना जारी केला. देशात विविध ठिकाणी हा कार्यक्रम झाला; नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तर पुणे जिल्ह्यातील नारायणगाव इथं केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

**अमितेश कुमार**

पुणे शहरात एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन यंत्रणा राबवण्यात येणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने कुमार यांच्याशी वार्तालाप आयोजित करण्यात आला होता; त्यावेळी ते बोलत होते. ही व्यवस्थापन यंत्रणा पुणे पोलीस विभाग हाताळणार असून एक ते सव्वा वर्षात या यंत्रणेची अंमलबजावणी केली जाईल, असं कुमार म्हणाले. एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन यंत्रणेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा समावेश असल्याने वाहतूक कोंडी कमी होईल तसंच प्रवासाचा वेग वाढण्यास मदत होईल असं ते म्हणाले. महिला सुरक्षेसाठी 80 कोटी रुपयांचा निधी पुणे पोलिसांना मिळाला असल्याचं आयुक्तांनी सांगितलं.

**मेधा कुलकर्णी**

नागरीकरणाच्या वाढत्या वेगाच्या काळात शहरं सुनियोजित सुंदर ठेवण्यासाठी धोरणकर्ते राजकीय नेते आणि वास्तुकला तज्ज्ञांनी एकत्रित येणं गरजेचं आहे असं मत खासदार प्राध्यापक डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केलं. पर्यावरण आणि नगर नियोजन क्षेत्रात कार्यरत पुण्यातील व्हीके ग्रुपच्या 51व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित प्रदर्शनाच्या समारोप सोहळ्यात त्या बोलत होत्या.

**हेमंत रासने**

सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत जाहिरात फलक लावणार नसल्याची घोषणा कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी आज केली. स्वच्छ, सुंदर, विकसित कसबा अभियानासाठी करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांबाबत माहिती देण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत रासने बोलत होते.

**बालविकास केंद्र**

पुणे जिल्ह्यात सुरू केलेल्या बालविकास केंद्रामुळे 67 अतितीव्र कुपोषित बालकांपैकी 54 बालकांची प्रकृती सुधारली आहे. तसंच 477 मध्यम कुपोषित बालकांपैकी 364 बालकं कुपोषणमुक्त झाली आहेत. उर्वरीत बालकांना

कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात येणार असल्याचं पुणे महिला आणि बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जामसिंग गिरासे यांनी सांगितलं.

**ग्रामपंचायत आरक्षण सोडत**

ग्रामविकास विभागाच्यावतीने पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतनिहाय आरक्षण निश्चित करण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीसाठी नागरिकांनी उपस्थित रहावं असं आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी केलं आहे.

**स्वच्छ जल स्वच्छ मन अभियान**

निरंकारी मिशननं अमृत अभियानाअंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्याचं आयोजन पुण्यात नुकतंच केलं होतं. जिल्ह्यातील इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी अशा विविध नद्या, तलाव अशा 42 ठिकाणी ही स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. हजारो निरंकारी स्वयंसेवक आणि भाविकांनी यात उत्साहाने भाग घेतला.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता हस्तांतरण, विवाह नोंदणी यासह विविध सेवांचा लाभ आता शहरातील नागरिकांना घरबसल्या घेता येणार आहे. महानगरपालिका आणि नोंदणी मुद्रांक विभागातील माहितीचं आदान प्रदान पूर्ण झाल्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ता हस्तांतरण ऑनलाइन पद्धतीनं शक्य झालं आहे.

**प्रकाशन**

विद्येचे माहेरघर अशी ओळख असलेलं पुणे आता औद्योगिक नगरी म्हणूनही ओळखलं जाऊ लागलं आहे, असं प्रतिपादन सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजूमदार यांनी नुकतंच पुण्यात केलं. सुनील देशमुख यांनी लिहिलेल्या 'विदेशमुखी' पुस्तकाचं प्रकाशन डॉ. मुजुमदार यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**फिरोदिया**

जनसेवा फाउंडेशनतर्फे 'भेटूया एका दिग्गजाला' या उपक्रमांतर्गत येत्या गुरुवारी प्रख्यात उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया यांचा सन्मान आणि प्रकट मुलाखतीचं आयोजन करण्यात आलं आहे. गणेश कला क्रीडामंच इथं दुपारी चार वाजता हा कार्यक्रम होणार असून तो सर्वांसाठी विनामूल्य खुला असल्याची माहिती जनसेवा फौंडेशनतर्फे आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल 36 तर किमान 14 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**